**नियमीत दिवाणी मुकादमा क्रं.१२६/२०२३ मधील नि. ५ खालील आदेश**

वादी यांनी दावा मिळकतीवर प्रतिवादी अथवा त्यांचेमार्फत इतर कोणीही हरकत अडथळा करु नये, याबाबत प्रस्तुतचा तुर्तातुर्त ताकीद अर्ज दिला आहे.

**अर्ज कथने संक्षिप्ततेत खालीलप्रमाणे–**

**२.** वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द निरंतर मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे.

**३.** वादीच्या कथनानुसार मौजे सिंदफळ ता.तुळजापूर, जि. धाराशिव येथील जमीन गट क्र. ५५६/६ ज्याचे क्षेत्र ० हे १० आर असुन आकार रु.१.९१ पैसे आहे. ज्याच्या चतुःसिमा दाव्याच्या व प्रस्तुतच्या अर्जाच्या परिच्छेद क्रमांक २ मध्ये नमुद केलेल्या आहेत त्यास येथुन **'दावा मिळकत'** असे संबोधले जाईल.

**४.** वादीच्या कथनानुसार, दावा मिळकत ही त्यांनी खरेदीखत क्र. ५१७/१९८२ नुसार ० हे ५ आर व खरेदीखत क्र. ३४६/१९८३ अन्वये दोन वेगवेगळया खरेदीखतान्वये खरेदी केलेली मिळकत आहे. त्याप्रमाणे, फेरफार क्र. १८९४ व ४४०१ नुसार त्यांच्या हक्कात नोंद झालेली आहे.

**५.** वादीच्या कथनानुसार, प्रतिवादी क्र.१ व इतर लोकांनी यापुर्वी देखील वादीस नाहक त्रास दिला आहे. वादी यांनी प्रतिवादी व इतर लोकांच्या विरुध्द दिवाणी दावा क्र. १०६/१९८८ हा दाखल केला होता. सदरील दावा दिनांक १२.०७.१९९४ मंजुर होवुन वादी हे दावा मिळकत विहीरीतील व चिंचेच्या झाडातील हिस्सेदार असल्याचे व त्यास प्रतिवादी यांनी हरकत अडथळा

न करण्याचे आदेश झालेला आहे.

६. वादीच्या कथनानुसार, सन २०१० मध्ये प्रतिवादी यांच्या सोबत वाद झाल्यानंतर वादी यांनी रु.१०० चे स्टॅम्प पेपरवर दिनांक २३.०३.२०१० मध्ये करार केला. सदरील करारानुसार वादीस समाईक विहीरीत साडे पाच आणे हिस्सा व चिंचेच्या झाडात सामाईक हिस्सा देण्याचे ठरले. त्यानंतर, प्रतिवादी यांनी २०२१ पर्यंत वादीचे विहीरीतील पाण्याचा  हिश्यास व चिंचेच्या झाडातील हिश्यास हरकत अडथळा केला. तसेच, प्रतिवादी यांनी दिनांक ०१.१०.२०२१ रोजी विहीर बुझविण्याचा प्रयत्न केला व पाणी घेण्यास व चिंचेच्या झाडावरील चिंचा घेण्यास वादीच्या हिश्यास अडथळा केला. त्यानंतर, वादी यांनी दिनांक १०.११.२०२१ रोजी ग्रामसेवक, सिंदफळ व दिनांक २१.०३.२०२२ रोजी मा. तहसिलदार यांना प्रतिवादी यांच्या विरुध्द तक्रार केली.

७. वादीच्या कथनानुसार, त्यांनी प्रतिवादी यांना त्यांच्या पाणी घेण्याच्या व चिंचेच्या झाडावरील चिंचा घेण्याच्या हिश्यास अडथळा करु नका अशी विनंती केली असता दिनांक १२.०३.२०२३ रोजी दुपारी १२ वाजता दरम्यान प्रतिवादी यांनी 'विहीरचा तुझा संबंध नाही, सदर विहीर आमची आहे व चिंचेचे झाड ही आमचे आहे' असे म्हणुन शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे, वादी यांनी पोलिस स्टेशन, तुळजापूर येथे प्रतिवादी यांच्या विरुध्द अदखलपात्र गुन्हा क्र.२६०/२०२३ कलम ५०४, ५०६ सह ३४ अन्वये तक्रार दिली. त्यामुळे, वादीस प्रस्तुतचा दावा व अर्ज दाखल करण्यास कारण घडले.

८. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी **(नि.क्र.१५)** कडे त्यांचे लेखी कैफियत व प्रस्तुतच्या अर्जास म्हणणे दिलेले आहे. प्रतिवादी यांनी त्यांच्या विरुध्द असलेले अर्ज कथन नाकारलेले आहे. प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार, वादी

यांनी दावा मिळकतीच्या चुकीच्या चतुःसिमा नमुद केलेल्या आहेत. प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार, दिनांक २३.०३.२०१० रोजी रु.१००/– स्टॅम्प पेपरवर वादी व प्रतिवादी क्र. १ व ५ व प्रतिवादी क्र. ४ यांचे वडील मयत हरी यांच्यामध्ये करार झाला. सदरील करारामध्ये सर्वांनी मिळुन विहीरीचे बांधकाम करावयाचे, त्यासाठी समाईक चिंचेचे झाड तोडुन विक्री करुन त्याचा पुर्ण पैसा विहीरीच्या कामासाठी वापरायचा असल्याचे कथन केलेले आहे.

९. प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार, सदरील करारामध्ये प्रतिवादी यांना सहा आणे, हरी माळी यांना आडीच आणे, रामचंद्र माळी यांना एक आणा व भारत माळी यांना एक आणा हिस्सेवारी साक्षीदारांच्या समक्ष दिलेले होते. प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार, वादी यांनी प्रतिवादी यांच्या विरुध्द रे.दि.मु.नं. ३२७/२०२१ दाखल केला होता व तो दावा हा खारीज करण्यात आला आहे. त्यामुळे, त्यांनी प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

१०. वादीतर्फे विधीज्ञ श्री. एस.के.कुलकर्णी यांचा युक्तीवाद ऐकला. वादीच्या वकिलांनी त्यांच्या युक्तीवाददरम्यान वादीला प्रथमदर्शनी कथन असल्याचे, न्यायाचा तौलनीक कल वादीच्या हक्कात असल्याचे व प्रस्तुतचा अर्ज नामंजुर केल्यास वादीचे नुकसान होणार असल्याचे कथन केले आहे. त्यामुळे, त्यांनी प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

११. याउलट, प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे विधीज्ञ श्री. के.के.कुलकर्णी यांनी त्यांच्या युक्तीवाददरम्यान वादीला प्रथमदर्शनी कथन नसल्याचे, न्यायाचा तौलनीक कल वादीच्या हक्कात नसल्याचे व प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींचे नुकसान होणार असल्याचे कथन केले आहे. त्यांनी प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

**१२.** अर्ज व म्हणणे विचारात घेतले. अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली. त्याचा सारासार विचार करुन याकामी मी खालील मुद्दे उपस्थित केले आहेत. त्यानुसार त्यांची कारणमीमांसा मी पुढीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीला प्रथमदर्शनी कथन आहे काय ? | नाही. |
| २. | न्यायाचा तौलनीक कल वादीच्या हितार्थ झुकणारा असा आहे काय ? | नाही. |
| ३. | ताकीद अर्ज नामंजूर केल्यास वादीचे नुकसान संभवतो काय ? | नाही. |
| ४. | आदेश काय ? | वादीचा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

**१३.** वादीतर्फे तुर्तातुर्त मनाई अर्जाचे समर्थनार्थ शपथपत्र दाखल केले आहे. तसेच वादी व प्रतिवादी यांनी प्रस्तुतच्या अर्जाच्या व म्हणणेच्या पृष्ठयर्थ वेगवेगळया कागदपत्रावरती त्यांची भिस्त ठेवलेली आहे. त्याबाबतचे सविस्तर विवेचन प्रस्तुत आदेशामध्ये योग्य ठिकाणी केले जाईल.

**मुद्दा क्र. १ ते ३ करीता** –

**१४.** वादप्रश्न क्र.१ ते ३ वर संबंधीत आलेला पुरावा एकसारखा असून संक्षिप्ततेकरिता मुद्दा क्र.१ ते ३ यांचे मी एकत्रीत विवेचन करुन उत्तर देत आहे.

**१५.** प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यासाठी वादींना प्रथमदर्शनी कथन असल्याचे, न्यायाचा तौलनीक कल त्यांच्या हक्कात असल्याचे व प्रस्तुतचा अर्ज

नामंजुर केल्यास त्यांचे नुकसान होणार असल्याचे हे सिध्द करावे लागणार आहे.

**१६.** वादीच्या कथानानुसार, दावा मिळकत ही त्यांनी खरेदीखत क्र. ५१७/१९८२, ३४६/१९८३ व त्यामधील विहीर ही खरेदीखत क्र. ८९३/१९९४ नुसार खरेदी घेतलेली आहे. तसेच, त्यांचे दावा मिळकतीला फेरफार क्र. १८९४, २०२३ व दावा मिळकतीमधील विहीरीला फेरफार क्र. ४४०१ नुसार नाव लागलेले आहे.

**१७.** यासंदर्भात, वादी यांनी खरेदीखत क्र. ५१७/१९८२, ३४६/१९८३ च्या सत्यप्रती व ८९३/१९९४ ची छायांकित प्रत अभिलेखावर दाखल केलेल्या आहेत. खरेदीखत क्र. ५१७/१९८२ च्या सत्यप्रतीचे अवलोकन केले असता वादीने दावा मिळकतीपैकी ५ आर क्षेत्र दिगंबर आबाराव आपटे यांच्या कडुन विकत घेतल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे. तसेच, खरेदीखत क्र. ३८६/१९८३ च्या खरेदीखताच्या सत्यप्रतीचे अवलोकन केले असता दावा मिळकतीपैकी ५ आर क्षेत्र रामचंद्र प्रल्हाद पाठक यांच्या विकत घेतल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे. तसेच, खरेदीखत क्र. ८९३/१९९४ च्या खरेदीखताच्या छायांकित प्रतीचे अवलोकन केले असता वादी व हरी दिगंबर माळी यांनी मल्लीकार्जुन सदाशिव भंडगे यांच्याकडुन दावा मिळकतीमधील एक विहीर व एक चिंचेच्या झाडामध्ये प्रत्येकी ३ आणे हिस्सा विकत घेतल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे.

**१८.** तसेच, वादीने दावा मिळकतीच्या फेरफार क्र. १८९४ व २०२३ च्या छायाकिंत प्रती अभिलेखावर दाखल केले आहे. सदरच्या छायाकिंत प्रतीचे अवलोकन केले असता दावा मिळकतीच्या १० आर क्षेत्राला वादीचे नाव लागल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे.

१९. वादीच्या कथनानुसार, ते दिवाणी दावा क्र. १०६/१९८८ मधील न्यायानिर्णयानुसार दावा मिळकतीचे मालक झालेले आहेत. यासदंर्भात, वादीने दिवाणी दावा क्र. १०६/१९८८ च्या हुकूमनाच्याची सत्यप्रत अभिलेखावर दाखल केले आहे. सदरच्या सत्यप्रतीचे अवलोकन केले असता वादी, शिवाजी दिगंबर माळी व बाळासाहेब मल्लीकार्जुन मांडगे यांचा दावा मिळकतीमधील विहीरीमध्ये व दोन चिंचेच्या झाडामध्ये हिस्सा असल्याचे घोषित केल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे.

२०. तसेच, वादीने दिवाणी दावा क्र. १०६/१९८६ दिवाणी अपील क्र. २५०/१९९४ च्या न्यायनिर्णयाची सत्यप्रत अभिलेखावर दाखल केले आहे. सदरच्या सत्यप्रतीचे अवलोकन केले असता मा. जिल्हा न्यायालयाने वादीचा दावा मिळकतीमधील विहीरमध्ये हिस्सा असल्याची कारणमिमांसा देवुन सदरचे अपील नामंजुर केल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे.

२१. वादीच्या कथनानुसार, त्यांचामध्ये व प्रतिवादी मध्ये सन २०१० मध्ये वाद झाल्यानंतर त्यांनी, प्रतिवादी क्र. १ व इतर हक्कदार यांनी करारनामा केल्याचे व त्यानुसार वादीस दावा मिळकतीमधील विहीरीत साडेपाच आणे हिस्सा व चिंचेच्या झाडात सामाईक हिस्सा देण्यात आल्याचे कथन केलेले आहे. यासंदर्भात, वादीने सदरील करारनाम्याची व फेरफार क्र. ४४०१ च्या छायांकित प्रत दाखल केलेली आहे. सदरील करारनाम्याच्या छायाकिंत प्रतीचे अवलोकन केले असता वादी यांना दावा मिळकतीमधील विहीरीचा साडेपाच आणे हिस्सा व चिंचेच्या झाडात इतर हिस्सेदारसह सामाईक हिस्सा दिल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे. तसेच, फेरफार क्र. ४४०१ च्या छायांकित प्रतीचे अवलोकन केले असता वादीचा दावा मिळकतीमधील विहीरीमधील साडेपाच आणे हिश्याची नोंद लागल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे.

२२. परंतु, प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार, वादी हे प्रस्तुतचा अर्ज दाखल करताना स्वच्छ हाताने आलेले नाहीत. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार, वादी व प्रतिवादी क्र. १, ५ व प्रतिवादी क्र. ४ चे वडील यांच्यामध्ये झालेला करारनाम्यानुसार त्यांनी सर्वांनी मिळुन विहीरीचे बांधकाम करायचे होते व सामाईक चिंचेचे झाड तोडुन, विक्री करुन त्याचा पुर्ण पैसा विहीरीच्या कामासाठी वापरायचा होता. तसेच, सदरील विहीरीवर जाण्यासाठी एक वाट दिलेली होती व त्या वाटेचा उपभोग सर्वांनी घ्यायचा होता.

२३. यासदंर्भात, वादीने दाखल केलेल्या करारनाम्याचे अवलोकन केले असता, प्रतिवादी म्हणतात त्यानुसार करारनाम्यातील सर्वांनी मिळुन विहीरचे बांधकाम करण्याचे व समाईक चिंचेचे झाड तोडुन, विक्री करुन त्याचा पुर्ण पैसा विहीरीच्या कामासाठी वापरायचा असे नमुद असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे. तसेच, सदरील करारनाम्याचे अवलोकन केले असता, दावा मिळकतीमधील विहीरीमध्ये प्रतिवादी क्र. १ यांचा सहा आणे हिस्सा, प्रतिवादी क्र. ४ यांचे वडील हरी माळी यांचा अडीच आणे हिस्सा असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे. तसेच, दावा मिळकतीच्या सातबारा उताराच्या सत्यप्रतीचे अवलोकन केले असता त्याच्या विहीरीमधील हिश्याची नोंद इतर हक्कामध्ये नमुद असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे.

२४. तसेच, प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार, वादीने करारनाम्याच्या अटीशर्तीनुसार दावा मिळकतीच्या विहीरीच्या बांधकामासाठी पैसे न दिल्याने त्यांनी सदरील करारनाम्याची पुर्तता न केल्याने त्यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे. याउलट, वादी यांच्या विधीज्ञांनी वादीने दावा मिळकतीमधील विहीरीच्या बांधकामासाठी खर्च केल्याचा युक्तीवाद केलेला आहे. यासदंर्भात, वादीच्या विधीज्ञांनी वादीच्या बँक खात्याचा उता–याची सत्यप्रत

अभिलेखावर दाखल केलेली आहे. परंतु, सदरच्या सत्यप्रतीवरुन वादीने दावा मिळकतीमधील विहीरीसाठी खर्च केला याचा प्रथमदर्शनी बोध होत नाही.

**२५.** त्यामुळे, वरील विवेचनाचा अधार घेता वादीने करारनाम्यानुसार पुर्तता केल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत नाही. तसेच, दावा मिळकतीमधील विहीरीमध्ये वादीसह प्रतिवादी क्र. १ व इतर हिस्सेदाराचा हिस्सा असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे. त्यामुळे, वरील विवेचनांचा आधार घेता वादीच्या हक्कात प्रथमदर्शनी कथन असल्याचे दिसुन येत नाही.

**२६.** दावा चालण्याकरीता वादीच्या हक्कात प्रथमदर्शनी कथन दिसुन येत नसल्यामुळे सोईचा तौलनिक कल विचारात घेण्याचे झाल्यास तो वादीच्या बाजुने निश्चितच नाही. त्यामुळे वादीची जास्त गैरसोय होईल किंवा कोणतेही नुकसान होईल अशी परिस्थिती दिसुन येत नाही.

**२७.** उपरोक्त संपुर्ण चर्चेच्या अनुषंगाने **मुद्दा क्र.१ ते ३** यांचे निष्कर्ष **नकारार्थी** निष्कर्षीत करुन **मुद्दा क्र.४** अन्वये खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. नि.५ चा तुर्तातुत ताकीद अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. या अर्जाचा खर्च मुळ दाव्यात समाविष्ठ करण्यात येत आहे.

KULDIP SUBASHRAO KULKARNI
Digitally signed by KULDIP SUBASHRAO KULKARNI
Date: 2025.01.07 17:28:05 +0530

दिनांकः– ०७/०१/२०२५ **( के. एस. कुलकर्णी )**

ठिकाणः–तुळजापूर. २ रे सह दिवाणी न्यायाधिश, क.स्तर,

तुळजापूर.

***

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | V.M.Gaikwad, Stenographer Gr. III (On Deputation) |
| Court | - | Jt.CJJD & JMFC Tuljapur |
| Date | - | 07.01.2025 |
| Order signed by the Presiding Officer on | - | 07.01.2025 |
| Order uploaded on | - | 07.01.2025 |